मौजा गाडगा, नागपूर येथील नगर भुमापन क्रमांक ४९, शिट क्र. १३ येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित केलेल्या स्वाती बंगला क्र. ६४/१ मधील ३७४४.४० चौ.मी. इतकी शासकीय जमीन पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर या कंपनी अधिनियम, २०१३ खाली नोंदणीकृत संस्थेस पत्रकार सभासदांकरीता क्लब चालविण्याच्या प्रयोजनार्थ वार्षिक नाममात्र रू. १/- दराने भुईभाडे आकारुन ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने, नियमित अटी व शर्तींवर, विशेष बाब म्हणून मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१८/प्र.क्र.८२/ज-८.

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, १ ला मजला,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०९ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ :- १. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र.- जमीन/कार्या-८(१)/ सीआर३३/१७/कावि-११३, दि.१५.०२.२०१९

२. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र.-अ.का./नझुल/ज.मा./कावि-५५४/२०१८, दि.२४.१२.२०१८

३. अध्यक्ष, पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांचे दि.१६.०१.२०१८ चे पत्र.

४. अध्यक्ष, पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्यामध्ये Leave & License बाबत दि.१७.१२.२०१६ रोजी झालेला करार

५. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. विकाक-२२१६/प्र.क्र.३२/मिव्य-२, दि.२७.०४.२०१८

प्रस्तावना :-

पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर या संस्थेच्या पत्रकार सभासदांकरीता करमणूक क्लब सुरू करण्याच्या अनुषंगाने मौजा गाडगा, नागपूर येथील नगर भुमापन क्रमांक ४९, शिट क्र. १३ येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित केलेल्या स्वाती बंगला क्र. ६४/१ मधील ३७४४.४० चौ.मी. इतकी जमीन पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांना वार्षिक नाममात्र रू. १/- दराने ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने मंजूर करण्याबाबत अध्यक्ष, पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांनी शासनास विनंती केली होती. त्याचप्रमाणे सदर संस्थेच्या पत्रकार सभासदांना सवलतीच्या दराने विविध सुविधा पुरविण्याकरीता उक्त जागेवर **अर्ध-वाणिज्यिक क्रियाकलाप** (semi-commercial

activities) करण्यासाठी परवानगी देण्याबाबत देखील अध्यक्ष, पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांनी **संदर्भ क्र. ३** च्या पत्रान्वये शासनास विनंती केली होती.

त्यानुषंगाने मौजा गाडगा, नागपूर येथील नगर भुमापन क्रमांक ४९, शिट क्र. १३ येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित केलेल्या स्वाती बंगला क्र. ६४/१ मधील ३७४४.४० चौ.मी. इतकी जमीन पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांना मंजूर करण्याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी **संदर्भ क्र. १** च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता.

सदर बाब लक्षात घेता, मौजा गाडगा, नागपूर येथील नगर भुमापन क्रमांक ४९, शिट क्र. १३ येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित केलेल्या स्वाती बंगला क्र. ६४/१ मधील ३७४४.४० चौ.मी. इतकी जमीन पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर या कंपनी अधिनियम, २०१३ खाली नोंदणीकृत संस्थेस पत्रकार सभासदांकरीता क्लब चालविण्याच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या **कलम ४०** अन्वये शासनास प्राप्त अधिकारांनुसार ३० वर्षांसाठी वार्षिक नाममात्र रू. १/- दराने भुईभाडे आकारून नियमित अटी व शर्तीवर भाडेपट्ट्याने देण्याची व सदर भाडेपट्ट्याचे त्याच तत्वावर नुतनीकरण करण्याची तरतूद भाडेपट्ट्यात अंतर्भूत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. ह्या संदर्भात दि. २० ऑगस्ट, २०१९ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत विचार विनिमय होऊन झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

<u>शासन निर्णय :-</u>

पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर यांनी केलेल्या विनंतीचा विचार करता मौजा गाडगा, नागपूर येथील नगर भुमापन क्रमांक ४९, शिट क्र. १३ येथील सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी महसूल व वन विभागाकडे प्रत्यार्पित केलेल्या स्वाती बंगला क्र. ६४/१ मधील ३७४४.४० चौ.मी. इतकी जमीन ,महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४० अन्वये शासनास प्राप्त अधिकारांनुसार, वार्षिक नाममात्र रू. १/- दराने भुईभाडे आकारून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने, नियमित अटी व शर्तीवर, पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर या कंपनी अधिनियम, २०१३ खाली नोंदणीकृत संस्थेस पत्रकार सभासदांकरीता क्लब चालविण्याच्या प्रयोजनार्थ मंजूर करण्यास व सदर भाडेपट्टा हा त्याच तत्वावर नुतनीकरण करण्यास पात्र राहील

अशी तरतूद भाडेपट्टयात अंतर्भूत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती</u> :-

१) पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर या कंपनी अधिनियम, २०१३ खाली नोंदणीकृत संस्थेस पत्रकार सभासदांकरीता क्लब चालविण्याच्या प्रयोजनार्थ वार्षिक नाममात्र रुपये १/- या भुईभाड्याने मंजूर करण्यात आलेली सदर शासकीय जमीन किंवा तिचा कोणताही भाग (किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबध) विक्री / देणगी देऊन / अदला बदल करुन / गहाण ठेऊन / पट्ट्याने देऊन / खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणाद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरित करता येणार नाही. सदर जमिनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती/ संस्था/ कंपनी इत्यादींचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अशा प्रकारे कोणताही आर्थिक व्यवहार अर्जदारास करता येणार नाही. तसेच शासनाच्या महसूल विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय सदर जमीनीचे पोटविभाजन करता येणार नाही.

२) पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर या संस्थेव्दारे पत्रकार सभासदांकरीता चालविण्यात येणाऱ्या सदर क्लबच्या व्यवस्थापनामध्ये संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी यांना पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर या संस्थेने सहयोगी करुन घेणे बंधनकारक राहील.

३) विषयांकित शासकीय जमीनीचा वापर केवळ मंजूर केलेल्या प्रयोजनासाठी करता येईल. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमिनीचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरुपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

४) विषयांकित शासकीय जमिनीवर संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या विहित परवानगीने व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास करणे बंधनकारक राहील. तसेच या व्यतिरिक्त आवश्यकते प्रमाणे अन्य संबधित विभाग / शासकीय यंत्रणा यांची मान्यता / पूर्वपरवानगी / ना- हरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

५) प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश / सूचना या प्रकरणी उक्त संस्थेस

बंधनकारक राहतील व त्यानुषंगाने आवश्यक खबरदारी / काळजी घेणे बंधनकारक राहील.

६) सदर जमिनीचा ताबा मिळाल्यापासून तीन वर्षाच्या आत बांधकामास सुरूवात करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियोजित वापर सुरू होईपर्यंत शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

७) शासकीय जमीन मंजूरी संदर्भातील इतर नियमित अटी या ठिकाणी लागू राहतील.

८) सदर जमीन मंजूर करण्याबाबतच्या अटी व शर्तींचा भंग झाल्यास जमीन शासनाकडून परत घेण्यात येईल.

९) **विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर** यांना आवश्यक वाटतील अशा अन्य अटी व शर्ती विहित करण्याची मुभा राहील.

०२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.३१८ / व्यय-०९/ २०१९, दि.०७.०८.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१९०९०९१७०१३७३३१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madhav Veer

Digitally signed by Madhav Veer
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forests Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b8bcafe4a890e79ceaf1ea38b990e1e22edaeda6d9d0b7d64088adc780cd25e6, serialNumber=3c0e93ab894790967228875f0b4fd8c2fda8590b77ae2ea700bf19e91a673afc, cn=Madhav Veer
Date: 2019.09.09 17:07:51 +05'30'

(डॉ. माधव वीर)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
७) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई -३२.
८) अपर सचिव (महसूल) यांचे वि.का.अ./ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई -३२.
९) प्रधान सचिव, (नगर विकास विभाग-१), मंत्रालय,मुंबई -३२.
१०) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.

११) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१२) जिल्हाधिकारी, नागपूर.

१३) अध्यक्ष, पत्रकार क्लब ऑफ नागपूर, नागपूर.

१४) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य (१), मुंबई -३२.

१५) मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य (२), नागपूर.

१६) नगर विकास विभाग (नवि-९), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.

१७) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.

१८) सर्व सह सचिव / उप सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

१९) निवड नस्ती, कार्यासन ज-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.